महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना राष्ट्रीय व राज्य नागरी उपजिवीका अभियांन अंतर्गत नियुक्त प्रकल्प अधिकारी, सहा प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटक यांना म.न.पा. व नगर परिषद सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत.

(१) ३८४३ (०७-०४-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना राष्ट्रीय व राज्य नागरी उपजिवीका अभियांनासंदर्भात दिनांक १० मे, २००२ व २८ ऑगस्ट, २०१४ चे शासन निर्णयानुसार नियुक्त प्रकल्प अधिकारी, सहा. प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटक यांना म.न.पा. व नगर परिषद सेवेत कायमस्वरुपी सामावून घेणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत्ची कार्यवाही केव्हा पुर्ण करण्यात येणार आहे ,

(३) असल्यास, म.न.पा. नगरपरिषद मधील सदर योजनेअंतर्गत कार्यरत प्रकल्प अधिकारी यांचा मंजूर आकृतीबंधात समावेश करणार काय,

(४) असल्यास, प्रकल्प अधिकारी सहा. प्रकल्प अधिकारी यांचे मार्फत म.न.पा. व.नगर परिषद मधील महिला बालकल्याण व इतर सामाजिक योजना राबविण्यास मदत होईल ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०५-२०१६) :(१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना २०१४ पासून बंद करण्यात आली असून त्याऐवजी राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान व राज्य नागरी उपजिविका अभियानाची अंमलबजावणी २८ ऑगस्ट, २०१४ पासून राज्यात सुरु झाली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शन सूचनांनुसार या अभियानासाठी नियुक्त करावयाचे प्रकल्प अधिकारी, सहायक प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटक हे निव्वळ कंत्राटी पध्दतीने अभियान कालावधीपुरते नियुक्त करावयाचे आहेत. त्यामुळे त्यांना महानगरपालिका / नगरपरिषद सेवेत कायमस्वरुपी समावून घेता येणार नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रातील बेकायदा होर्डिंगविरोधात कारवाई करण्याबाबत.

(२) ९२२७ (०७-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका तसेच नगरपरिषदा यांचेकडून अंमलबजावणी होत नसल्याने बेकायदा होर्डिंगला आळा घालण्यासाठी दिलेल्या आदेशाची मा. उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाचा अंकुशच राहिला नाही अशी खंत व्यक्त करून न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती अनिल मेमन यांच्या खंडपीठाने शासनाला कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्याचा आदेश दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यायालयाने राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका तसेच नगरपरिषदांच्या कामकाजावर तीव्र नाराजी व्यक्त करून बेकायदा होर्डिंगविरोधात कारवाई करून कृती अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असतांना सूचनांची तसेच आदेशाची पूर्तता संबंधित अधिकाऱ्यांकडून होत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी तपासणी करण्यात आली आहे का, तपासणी अंती दोषींवर अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०५-२०१६) :(१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. ज्या महानगरपालिका/ नगरपरिषनी अनधिकृत होंर्डीगबाबत कारवाई केलेली नाही, त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र नगरपरिषदा, नंगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्याबाबत संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना आदेशित केले आहे.

(३) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बेकायदा होर्डीग विरोधात करण्यात आलेल्या कारवाईबाबत मा.उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करण्याच्या सूचना सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

अंबरनाथ (जि. ठाणे) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेचे काम निकृष्ट झाल्याबाबत

(३) ११४३७ (०७-०४-२०१५). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जीवन प्राधिककरण, जलव्यवस्थापन विभाग, अंबरनाथ अंतर्गत रुपये ७७ कोटीचा अंबरनाथ वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, अंबरनाथ व मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील ८० टक्के पाणी पुरवठा योजना अपूर्ण असून २० टक्के पाणी पुरवठा योजना निकृष्ट दर्जाच्या असल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित ठेकेदार व संबंधित पाणी पुरवठा अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच प्रश्न भाग (१) मधील योजनेच्या कामाचे कार्यादेश केव्हा देण्यात आले आहेत वा सदर योजनेच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१६) :(१) रु.७७.०५ कोटीची अंबरनाथ वाढीव पाणी पुरवठा योजना मंजूर आहे.
(२) हे खरे नाही. अंबरनाथ व मुरबाड तालुक्यातील पाणी पुरवठा योजना निकृष्ट दर्जाच्या आहे अशी बाब नाही.

अंबरनाथ तालुक्यातील ४३ नळ पाणी पुरवठा योजनांपैकी १७ योजना अंतिम होऊन ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करण्यात आल्या असून १४ योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झाल्या आहेत. तर १२ प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

मुरबाड तालुक्यातील १७२ नळ पाणी पुरवठा योजनेपैकी २१ योजना अंतिम होऊन ग्रामपंचायतींकडे हस्तांतरीत करण्यात आल्या असून १९ योजना भौतिकदृष्ट्या पूण्र झाल्या आहेत. १२३ प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर असून ८ प्रकल्पांची कामे बद आहेत. तथापि एक प्रकल्पाचा उद्भव कोरडा झालेने योजना सुधारीत करणेत येत आहे.
(३) मुरबाडमधील १० नळ पाणी पुरवठा योजनांच्या अध्यक्ष/सचिवांवर अपहार केल्याने त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करणेत आला आहे तसेच ०१ तांत्रिक सेवा पुरवठादारावर ०३ नळ पाणी पुरवठा योजनांच्या कामांबाबत फौजदारी गुन्हा दाखल करणेत आला आहे.

अंबरनाथ वाढीव पाणी पुरवठा योजनेचे कार्यादेश दि.०५.०४.२०१३ रोजी देण्यात आले आहे व योजनेची कामे स.स्थितीत प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत

(४) १६७५४ (१०-०८-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले असतांना असंख्य फेरीवाल्यांची पालिका अधिकाऱ्यांनी नोंदणी केलीच नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदपथ फेरीवाला कायदा - २०१४ नुसार नियम न बनविता पालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीने फेरीवाल्यांना व्यवसाय करता येऊ नये असे जाचक अटी व नियम तयार करुन तो शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आल्याने फेरीवाल्यांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळणार असल्याचेही निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणाबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला आहे, वा कार्यान्वित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०५-२०१६) :(१) हे खरे नाही. केंद्र शासनाने पदपथावरील विक्रेता (उपजिवीका संरक्षण व पदपथावरील विक्री विनियम) अधिनियम, १ मे, २०१४ पासून लागू केला आहे. या अधिनियमाची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी कलम ३८ व ३६ नुसार राज्याने योजना व नियम तयार करायचे आहेत. त्यानुसार प्रारुप नियम प्रसिध्द करुन त्या अनुषंगाने प्राप्त हरकती व सूचना विचारात घेवून नियम अंतिम करण्यात येत आहेत. नियम अंतिम झाल्यावर योजनेचे प्रारुप हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करण्यात येईल.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) योजना व नियम तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

मुंब्रा (जि.ठाणे) प्रभाग समितीचे बेकायदा इमारतीमध्ये सुरु असलेली कार्यालये बंद करण्याबाबत

(५) १७८९४ (१२-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंब्रा (जि.ठाणे) प्रभाग समितीचे बेकायदा इमारतीमध्ये सुरु असलेली कार्यालये बंद करुन कार्यालय नवीन इमारतीमध्ये स्थलांतर करावे अन्यथा धोकादायक व बेकायदा इमारतीमधील कार्यालयास टाळे ठोकून आंदाेलन करण्याचा इशारा दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी नागरिकांनी महानगरपालिकेला दिलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रश्नी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच मुंब्रा प्रभाग समितीचे कार्यालय महापालिकेच्या इमारतीमध्ये सुरु करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) मुंब्रा प्रभाग समितीचे कार्यालय शैलेश नगर येथील सहयोग शॉपिंग सेंटर या इमारतीमधून एम.एम.व्हॅली, कौसा येथील बी.एस.यू.पी.चे इमारतमध्ये दिनांक १४.०९.२०१५ रोजीस्थलांतरीत करण्यात आलेले आहे.

ठाणे महानगरपालिका परिसरातील ५८ अतिधोकादायक इमारतीबाबत

(६) १८३०८ (११-०८-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका परिसरातील ५८ अतिधोकादायक इमारती दिनांक ३१ मे, २०१५ पर्यंत तोडण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्तांनी मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) तेथील रहिवाश्यांना ऐन पावसाळ्यात पुनर्वसनासाठी दुसऱ्या ठिकाणी जावे लागणार असल्याने तेथे उद्भवणाऱ्या प्रश्नांवर कोणतीही व्यवस्था रहिवाशांसाठी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तेथील रहिवाश्यांना पुनर्वसित ठिकाणी योग्य त्या सोयीसुविधा देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१६) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) धोकादायक /अतिधोकादायक इमारतीमधील भोगवटादारांचे तात्पूरते पुनर्वसन करण्यासाठी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून दोस्ती कॉर्पोरेशन प्रा.लि. यांचेमार्फत रेंटल हाऊसिंग स्कीम अंतर्गत वर्तकनगर येथे बांधण्यात आलेल्या दोस्ती विहारमधील १४४८ सदनिकांमध्ये करण्यात येत आहे. त्यामध्ये विविध ठिकाणच्या अपद्ग्रस्तांना जुन २०१५ ते दि.३१-८-२०१५ पर्यंत एकूण २३४ कुटूंबांना उपरोक्त इमारतींमध्ये स्थालांतरित करण्यात आले आहे.

उपरोक्त ठिकाणच्या रेंटल हाऊसिंग स्कीम येथील संक्रमण इमारतींच्या ठिकाणी आवश्यक त्या सोयीसुविधा उदा. पाणी, विज, मलनिस्सारण व्यवस्था, उद्वाहन, सुरक्षा रक्षक इ. देण्यात आलेल्या आहेत. सदर सोयीसुविधा संदर्भात देखभाल व तक्रारींचे निराकरण करण्याच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना लेखी सूचना निर्गमित केल्या आहेत.

ठाण्यातील शिवाईनगर परिसरात म्हाडाने भागीदारीत केल्या प्रकल्पाच्या कराराची चौकशी करण्याबाबत

(७) २०३८३ (१२-०८-२०१५). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यातील शिवाईनगर परिसरात अल्प गटातील कुटुंबाना माफक दरात घरे उपलब्ध व्हावी या हेतूने म्हाडाने भागीदारीत एका प्रकल्पाचा करार केला होता सदर करारात म्हाडाने आखलेल्या धोरणाच्या माध्यमातून या प्रकल्पासाठी एकूण अडीच चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यात आला होता हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बेकायदेशीर कराराची चौकशी करण्याचे आदेश लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे महासंचालक यांना दिले आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, व तदनुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता (२७-०५-२०१६) :(१) मे.कॉकर्ड डेव्हलपर्स यांच्या मालकीच्या स.न.१९२/२ अ, १९२/२ ब, १९३/२ ब व १९४/३ ब पोखरण रोड नं. २ माजीवडे, ता.जि.ठाणे येथील जमीनीवर म्हाडासोबत राबवावयाच्या संयुक्त भागीदारी प्रकल्पाबाबतच्या सुधारीत करारनाम्याच्या मसुद्यांस उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी दि. २२.०१.२०१६ रोजी मान्यता दिली आहे

(२), (३) व (४) याबाबत पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांच्याकडे कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही.

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुनरुत्थान अभियान अंतर्गत नागपूर महानगरपालिकेचे १९ प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(८) २२११४ (११-०८-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुनरुत्थान अभियान (जेएनएनयुआरम) अंतर्गत महानगरपालिकेने १९ प्रकल्प हाती घेतले असून त्यातील १२ प्रकल्प पूर्ण झाले परंतु माहे मार्च, २०१४ पासुन ही योजना संपुष्टात आल्याने त्याचा फटका ७ प्रकल्पाला बसला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सात रखडलेल्या प्रकल्पामध्ये पेंच टप्पा ४ च्या भाग १ ते ४ योजनाचा समावेश आहे. भाग १ ही १४४.६३ कोटींची योजना असुन यात वाढीव पाणी पुरवठा योजनेतील पंपीग हाऊस, कन्हान येथील ग्रहणविहिर, कोलार नदीवरील पुलाचे बांधकाम, २७.५ कि.मी. लांबीची भूमीगत पाईपलाईन टाकणे, आदी कामांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भाग ३ मध्ये शहरातील पाणी वितरण व्यवस्था मजबुत करावयाची असून त्यात २६९ कि.मी. लांबीची पाईपलाईन टाकण्याचे काम समावेश आहे. परंतु केंद्राकडुन निधी उपलब्ध न झाल्याने या सर्व प्रकल्पाच्या कामावर विपरीत परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सात प्रकल्पाची कामे त्वरीत पूर्ण करण्याकरिता केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे काय, त्याचा कालावधी काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुनरुत्थान अभियान (जेएनएनयुआरएम) अंतर्गत एकूण १९ मंजूर प्रकल्पाचा समावेश होता. सद्य:स्थितीत त्यातील १६ प्रकल्प पूर्ण झालेल्या आहे. यापैकी ३१ मार्च, २०१४ पर्यंत ५० टक्क्यापेक्षा जास्त भौतिक प्रगती असलेल्या दोन प्रकल्पाना केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत वित्तीय अनुदान नुकतेच मंजूर करण्यात आलेले आहे. उर्वरित तीन प्रकल्पाची कामे महानगरपालिकेच्या नागरी सुधार प्रकल्प तर्फे स्वनिधीतून राबविण्यात येत आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

पेच टप्पा ४ भाग १ ते ४ योजनांची कामे पूर्ण झालेली आहेत.

(४) जेएनएनयुआरएम अंतर्गत अपूर्ण असलेले ३ प्रकल्पांची कामे नागपूर महानगरपालिका स्वनिधीतून पूर्ण करणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील खाजगी इमारतींना फायर ऑडिट करण्याबाबत

(९) २३६५९ (११-०८-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील २ हजार खाजगी इमारतीपैकी केवळ १०९ इमारतींचे फायर ऑडिट झाल्याचे माहे मे मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित १८९१ इमारतींची कोणतीही तपासणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी इमारतींना एकदा ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर पुन्हा कोणतीच परवानगी घ्यावी लागत नसल्याने त्यांच्याकडून तपासणीकडे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी इमारतींना फायर ऑडिट करुन इमारतींमध्ये प्रतिबंधात्मक योजना न केल्यास त्यांना अग्निशमक दलाकडून खबरदारी म्हणुन पत्रव्यवहार (नोटीस) केला जातो, त्याचे पालन न करणाऱ्या इमारतींवर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात येते,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०१६) :(१) हे खरे नाही. पुणे शहरातील एकूण ११८ खाजगी इमारतीचे लायसन्स प्राप्त अभिकरणांमार्फत फायर ऑडिट करण्यात आलेले असून, तेथील आगप्रतिबंधक उपाययोजना योग्यरित्या कार्यान्वित असल्याचे दिसून आलेले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही. तथापि, महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मध्ये सूचित केल्याप्रमाणे इमारतीचे मालक / भोगवटादार यांना नोटीस बजावण्यात येते. सदर नोटिसीचे पालन न केल्यास सदर इमारतीचा पाणी व वीज पुरवठा खंडित करण्यंची कारवाई करण्यात येते. त्यानंतरही आगप्रतिबंधक उपाययोजना कार्यान्वित न केल्यास अशी इमारत सील करण्याची कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात जेष्ठ नागरिक सुरक्षित नसल्याबाबत

(१०) २९६२३ (२१-०१-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जेष्ठ नागरिकांवर एकंदर ३९८१ हल्ले करण्यात आले असून राज्यात २१.२ टक्के घटना घडल्या असल्याने जेष्ठ नागरिक सुरक्षित नसल्याचे नॅशनल क्राईम रेक्रॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीवरून माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्येष्ठ नागरिकांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१६) :(१) ऑक्टोबर, २०१५ मध्ये नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोने सन २०१४ मध्ये दाखल गुन्ह्यांची राज्यनिहाय माहिती प्रकाशित केली असून जेष्ठ नागरिकांबाबत देशात एकूण १८७१४ गुन्हे दाखल आहेत. महाराष्ट्रात जेष्ठ नागरिकांबाबत एकूण ३९८१ (२१.२%) गुन्हे दाखल असून त्यामध्ये जेष्ठ नागरिकांवरील हल्ल्यांबाबतच्या गुन्ह्यांची संख्या ३०९ (७.७%) एवढी आहे.
(२) यासंदर्भात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक २८.१.२०१३ च्या परिपत्रकान्वये जेष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत राज्यातील सर्व पोलीस प्रमुख यांना आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील हिंजवडी आय.टी परिसरात लुबाडणूक करणाऱ्या तरुणींची टोळी सक्रीय असल्याबाबत

(११) २९९०७ (२१-०१-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील हिंजवडी आय.टी परिसरात रात्रीच्या वेळी पुरुषांची लुबाडणूक करणाऱ्या तरुणींची टोळी सक्रीय असून या टोळीने अनेक आय.टी. अभियंत्यांची तसेच या परिसरातील गृहप्रकल्पांवर काम करणाऱ्या कामगारांची लुबाडणुक केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१६) :(१) व (२) पुणे येथील हिंजवडी आय.टी परिसरात रात्रीच्या वेळी पुरुषांची लुबाडणूक करणाऱ्या तरुणींची टोळी सक्रीय असून या टोळीने अनेक आय.टी अभियंत्यांची तसेच या परिसरातील गृहप्रकल्पावर कामे करणाऱ्या कामगारांची लुबाडणूक केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्हयातील शहरात रस्त्यावर सर्वत्र खड्डे झाल्याबाबत

(१२) ३०३६८ (२१-०१-२०१६). श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील शहरात रस्त्यावर सर्वत्र खड्डेच खड्डे झाले असून सदर खड्डे हे नगरपालिकेकडून माती टाकून बुजविले जात असल्याने रस्ते सर्वत्र उखडले असल्यामुळे शहरात धुळीचे साम्राज्य पसरले असल्याने येथील रहिवाशांना श्वसनाच रोग होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्याचे खड्डे मातीने बुजविण्यास नगरपालिकेला मनाई करण्याचे आदेश देऊन या रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी येथील नागरीकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरात रिंग रोड (एचसीएमटीआर) प्रस्तावित प्रकल्प महापालिकेच्या भूसंपादन करण्यास विलंब होत असल्याने रखडल्याबाबत

(१३) ३०४२० (२१-०१-२०१६). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात रिंग रोड (एचसीएमटीआर) प्रस्तावित प्रकल्प महापालिकेच्या भूसंपादन करण्यास विलंब होत असल्याने सदरील प्रकल्प रखडल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्यासुमारास उजेडात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकल्प गेले २८ वर्षापासून प्रलंबित असल्याने हा प्रकल्प पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाकडे देण्यात यावा अशी मागणी उपमहापौर यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरातील प्रस्तावित रिंग रोड प्रकल्प पीएमआरडीएकडे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०१६) :(१) होय, सदर रस्त्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरु असून, पुणे महानगरपालिकेच्या ताब्यता आलेल्या जागेवर रस्ता विकसित करण्याचे काम सुरु आहे.

(२) व (३) नाही. तथापि, पालक मंत्री, पुणे यांच्या समवेत दिनांक १८.५.२०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये एच.सी.एम.टी.आर प्रकल्प पीएमआरडीए मार्फत राबविणे संयुक्तिक होवू शकेल अशी चर्चा झाली. त्याअनुषंगाने पीएमआरडीए व पुणे महानगरपालिका यांच्याकडून तपासणी करण्यात येत आहे.

(४) एच.सी.एम.टी.आर रस्त्यासाठी एकूण ६८.०३ हेक्टर क्षेत्राची आवश्यकता आहे. सदर क्षेत्रापैकी १४.०७ हेक्टर क्षेत्र पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात असून, त्यावर रस्ता विकसित करण्याची कार्यवाही सुरु आहे. उर्वरित क्षेत्रापैकी २८.४७ हेक्टर क्षेत्राचे प्रस्ताव, वनविभाग, जलसंपदा विभाग, विद्यापीठ, रेल्वे संरक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, येरवडा कारागृह व संबंधित विभागाकडे पाठविण्यात आलेले असून, सदर क्षेत्र ताब्यात घेण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून पाठपुरावा सुरु आहे. उर्वरित २५.४९ हेक्टर इतके क्षेत्र खाजगी असून, या सर्व क्षेत्राचे भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे सादर केलेले असून, त्यांच्यामार्फत सदर क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही सुरु आहे.

नवी मुंबईतील कोपरखैराणे येथील अहिल्याबाई होळकर माता बाल रुग्णालय मोडकळीस आल्याबाबत

(१४) ३०९५९ (२१-०१-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील कोपरखैराणे येथील अहिल्याबाई होळकर माता बाल रुग्णालय मोडकळीस आले आहे त्यामुळे रुग्णांना जीव मुठीत घेऊन उपचार घ्यावा लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयाची स्थिती अत्यंत दयनीय झाल्याने हे रुग्णालय रिकामे करुन सुरक्षित जागी हलविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२१०६) :(१) नवी मुंबईतील अहिल्याबाई होळकर माता बाल रुग्णालय, कोपरखैरपणे या रुग्णालयाच्या इमारतीची नवी मुंबई महानगरपालिकेकडून संरचनात्मक तपासणी (Structural Audit) करण्यात आली असून या तपासणीअंती सदर इमारत धोकादायक असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या रुगणालयाची इमारत पाडून त्याठिकाणी नवीन इमारत बांधण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. परिणामी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून सदर रुग्णालय सद्य:स्थितीत बंद ठेवण्यात आले आहे.

(२) हे रुग्णालय बंद असल्याच्या पार्श्वभूमीवर रुग्णांची गैरसोय होवू नये, याकरिता पर्यायी व्यवस्था म्हणून महानगरपालिकेकडून सार्वजनिक रुगणालय, ऐरोली येथे वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असल्याचे आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील बिबवेवाडीतील गंगाधाम चौकातील अग्निशामक केंद्राबाबत

(१५) ३३२५४ (२१-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील बिबवेवाडीतील गंगाधाम चौकातील अग्निशामक केंद्र बांधून तयार झाले असतांना ते अद्यापही वापराविना असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिबवेवाडी परिसरात आग लागल्यास मुख्य अग्निशामक केंद्राची गाडी पोहोचण्यास वाहतुकीमुळे विलंब होत असल्याने अधिक प्रमाणात हानी होत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेची शहरात अकरा अग्निशामक केंद्र असून तीन केंद्र बांधून तयार आहेत; परंतु ती वापराविना पडून आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०१६) :(१) होय, अद्याप सदर अग्निशामक केंद्राचा ताबा महानगरपालिकेकडे आलेला नाही.
(२) सदर परिसरात आग लागल्यास मुख्य अग्निशमन केंद्रासह कात्रज अग्निशमन केंद्र आणि नव्याने सुरु करण्यात आलेल्या केंढवा अग्निशमन केंद्राकडील अग्निशमन वाहने तातडीने रवाना करण्यात येतात.
(३) व (४) महानगरपालिकेची शहरामध्ये एकूण १२ अग्निशमन केंद्रे कार्यरत असून, नवीन २ अग्निशमन केंद्रापैकी एका अग्निशमन केंद्राचे बांधकाम महापालिकेकडून करण्यात येत आहे तर दुसरे बिबवेवाडी, गंगाधाम चौक येथील अग्निशमन केंद्र ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदररील अग्निशामक केंद्रांची बांधकामे पूर्ण होऊन ताब्यात आल्यावर ती कार्यान्वित करण्यात येतील.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

शिर्डी संस्थानच्या खेडेगावात उपचार करणाऱ्या फिरत्या पथका मार्फत दिलेल्या औषधीच्या गोळीत लोंखड आढळल्याची बाब

(१६) ३३४४५ (२१-०१-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिर्डी संस्थानच्या खेडेगावात उपचार करणाऱ्या फिरत्या पथका मार्फत दिलेल्या औषधीच्या गोळीत लोंखड आढळल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने संबंधित औषध निर्मित करणा-या कंपनीवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०१६) :(१) याबाबत कोणत्याही प्रकारची लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत

(१७) ३४४०३ (२१-०१-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील कात्रज-कोंढवा रस्त्याचा ताबा महापालिकेला मिळून ६ वर्षे होऊनसुद्धा महापालिका प्रशासनाकडून रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत कोणतीही कार्यवाही न झाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधिनी नागरिकांसह दिनांक ३०/०८/२०१५ रोजी रास्ता रोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आंदोलनाची दाखल घेवून शासनाने त्यावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०१६) :(१) होय.

(२) कात्रज कोंढवा रस्त्याकरीता केंढवा बु. व कात्रज येथील २४ मी.डी.पी. रस्त्याकरीता ४२२४.६८ चौ.मी. व ८४ मी.डी.पी. रस्त्याकरिता १५१९१.५८ चौ.मी. क्षेत्राचे एफ.एस.आय / टी.डी.आर. अन्वये ताबे घेण्यात आलेले आहे. ८४ मी. डी.पी. रस्त्याकरिता ५४५० चौ.मी. क्षेत्र ताब्यात घेण्याकरिता प्रस्तावित आहे. तसेच सदरचा रस्ता विकसित करण्याकरिता डिफर्ड पेमेंट पध्दतीने निविदा मागविण्यास स्थायी समिती पुणे महानगरपालिकेस निवेदन सादर करण्यात आलेले आहे. तसेच सदर रस्ता रुंदीतील जागा ताब्यात घेण्याकरिता मिळकत धारकास विनंती पत्र देण्याची व जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

(३) वरीलप्रमारणे कार्यवाही सुरु आहे.

पुणे महापालिकेच्या विविध विभागांकडे अनेक उच्चशिक्षित अधिकारी असताना सल्लागार कंपन्या नेमून त्यावर कोट्यवधी रुपये खर्च करीत असल्याबाबत

(१८) ३५४१६ (२१-०१-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेच्या स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा यासह विविध विभागांकडे अनेक उच्चशिक्षित स्मार्ट अधिकारी असताना शहरात राबविण्याच्या महत्वाच्या प्रकल्पांसाठी मात्र सल्लागार कंपन्या नेमून त्यावर कोट्यवधी रुपये खर्च करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार महापालिकेतील कामे सल्लागार कंपन्या नेमून करण्याऐवजी महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून करुन घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०१६) :(१) हे खरे आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनेतून व अर्थसहाय्यीत तसेच पुणे महानगरपालिकेमार्फत महत्वकांक्षी प्रकल्प राबविले जातात. त्यामध्ये उड्डाणपूल, नदीवरील पूल, भुयारी मार्ग, नदीसुधारणा प्रकल्प, पाणी पुरवठा व मलनि:सारण इ. चा समावेश असून, सदर प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यंसाठी महानगरपालिका बांधिल आहे.

सदर कामे विशिष्ट स्वरुपाची असल्याने त्यासाठी लागणारा Design Core Staff चा Expertise Group पुणे महानगरपालिकेकडे नाही. आधुनिक तंत्रज्ञानाशी सांगड घालून अद्ययावत विशिष्ट असे Design व रचना देण्यासाठी सल्लागाराकडे उपलब्ध असणारा विशिष्ट असा Staff इ. कारणांमुळे पुणे महानगरपालिका सदरची कामे सल्लागारांमार्फत करुन घेतली जातात, ही वस्तुस्थिती आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) महानगरपालिकेडील नियमित देखभाल व दुरुस्तीचे काम सोडून नवीन रस्ता बांधणी प्रकल्प, नवीन पूल, उड्डणपूल, नदीवरील पूल, भुयारी मार्ग, नदी सुधारणा प्रकल्प इ. विशिष्ट प्रकारच्या कामासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यात येते. विशिष्ट स्वरुपाचे (प्रकल्प) कामे सोडून इतर सर्व प्रकारची कामे पुणे महानगरपालिकेमधील अभियंतांकडूनच केली जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हयातील घरेलू कामगार सन्मान धन व इमारत बांधकाम कामगार अर्थसहाय्य योजनेंतर्गत नोंदणी झालेल्या कामगारांचे अर्ज मंजुरीसाठी प्रलंबित असल्याबाबत

(१९) ३७८३२ (२१-०१-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात शासनाकडून जाहीर असलेल्या घरेलू कामगार सन्मान धन व इमारत बांधकाम कामगार अर्थसहाय्य योजनेंतर्गत नोंदणी झालेले जिल्ह्यातील सुमारे १७ हजार कामगारांचे अर्ज गेले दोन वर्षापासून मंजुरीसाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांना सन्मान धन व अर्थसहाय्य देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता (१९-०५-२०१६) :(१) व (२) हे अंशत: खरे आहे. रत्नागिरी जिल्ह्यात, घरेलू कामगार कल्याण मंडळाकडे ८९०३ इतके घरेलू कामगार नोंदित आहेत. त्यापैकी सन्मान धन योजनेंतर्गत १४९९ कामगारांन प्रत्येकी रुपये १०,०००/- याप्रमाणे रुपये १,४९,९०,०००/- इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे एकूण ९९४६ इतके कामगार नोंदित आहेत. त्यामधील १२४४ कामगारांना अर्थसहाय्याची रक्कम रुपये ३०००/- प्रमाणे रुपये ३७,३२,०००/- इतक्या रकमेचे लाभ देण्यात आलेले आहेत. उर्वरित ८७०२ अर्जांची छाननी सुरु असून त्यांना देखील योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सन्मान धन योजनेस पात्र ठरत असलेल्या व अर्ज केलेल्या कामगारांना लाभ देण्यात येत आहेत.

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळांतर्गत नोंदित कामगारांना अर्थसहाय्य देण्याकरिता मंडळाकडे रत्नागिरी जिल्ह्यामध्ये उपलबध कर्मचारीवृंदा मार्फत काम सुरु आहे यानुसार अर्जांची छाननी सुरु असून क्रमानुसार प्राप्त अर्जांचे इमारत व इतर बांधकाम कामगारांना गृहोपयोगी वस्तू खरेदीसाठी रुपये ३,०००/- चे अर्थसहाय्य देण्याची प्रक्रिया चालू आहे. सदर प्रक्रियेमध्ये अपुऱ्या कर्मचारी वृंदामुळे विलंब होत आहे, परंतु लाभ वाटपाची प्रक्रिया चालू आहे.

पुणे महानगरपालिकेतंर्गत कात्रज शहरास पायाभूत सोयीसुविधा पुरविण्याबाबत

(२०) ३८७९९ (२३-१२-२०१५). श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत सहभागी होऊनही कात्रजकार नागरिकांच्या अंतर्गत रस्ते, ड्रेनेज लाईन, पाणी या पायाभूत समस्या सुटल्या नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०१६) :(१) व (२) पुणे महानगपालिका कार्यक्षेत्रातील कात्रज परिसराकरिता महानगरपालिका अंदाजपत्रकात उपलब्ध झालेल्या तरतुदीनुसार रस्ते, ड्रेनेज लाईन, पाणी इ. पायाभूत सुविधांची कामे पुणे महानगरपालिकेने केली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील धारावी येथील मुख्य जलवाहिन्याजवळ झोपड्या हटवून मोकळ्या झालेल्या जागेचा गैरवापर होत असल्याबाबत

(२१) ४००२२ (१६-०३-२०१६). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर २ वर्षापूर्वी मुंबईतील धारावी येथील मुख्य जलवाहिन्याजवळ असलेल्या सुमारे १५० झोपड्या हटविण्यात आल्या परंतु, झोपड्या हटवून मोकळया झालेल्या जागेचा गैरवापर होत असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपड्या हटवून २ वर्षे उलटून गेले असूनही सदर जागेला संरक्षण नसल्यामुळे रात्रीच्या वेळेस या जागेत असामाजिक कृत्य होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच दिवसा जलवाहिनीतून गळती होणा-या पाण्याचे माफीया विक्री करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जागेचे योग्यरित्या संरक्षण करण्याकरिता शासन कोणती कारवाई करणार आहे वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०३-२०१६) :(१) व (२) मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर २ वर्षापूर्वी मुंबईतील धारावी येथील मुख्य जलवाहिन्याजवळ असलेल्या सुमारे १५० झोपड्या हटविण्यात आल्या परंतु , झोपड्या हटवून मोकळ्या झालेल्या जागेचा गैरवापर होत असल्याचे व झोपड्या हटवून २ वर्षे उलटून गेले असूनही सदर जागेला संरक्षण नसल्यामुळे रात्रीच्या वेळोस या जागेत असामाजिक कृत्य होत असल्याची बातमी दिनांक ७ जानेवारी, २०१६ च्या मुंबई सकाळ या वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली होती.

तथापि, या बातमीत तथ्य नाही व सदर जागेला जलवाहिनींच्या दोन्ही बाजूंनी संरक्षण भिंत बांधण्यात आली आहे. तसेच समोरुन ये-जा करण्यासाठी कुलुप बंद फाटक लावलेले असल्याने या जागेत असामाजिक कृत्य होण्यास वाव नाही, असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) जलवाहिनीतून गळती होणाऱ्या पाण्याची माफिया विक्री करीत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, सदर जागेतील भूमिगत जलवाहिनीमध्ये आढळून आलेल्या गळतीची दुरुस्ती महापालिकेमार्फत दि.१९.०१.२०१६ रोजी करण्यात आली आहे.

सदर जागेला जलवाहिनींच्या दोन्ही बाजूंनी महापालिकेमार्फत संरक्षण भिंत बांधण्यात आली आहे व जागेच्या समोरुन ये-जा करण्यासाठी कुलुप बंद फाटक लावण्यात आले आहे.

सदर ठिकाणी एम.एम.आर.डी.ए. चे पदाचारी पूल बांधणारे कंत्राटदार व महापालिकेमध्ये नवीन जलवाहिनीचे काम करणारे कंत्राटदार यांना ठराविक वेळेसाठी त्यांची यंत्रसामुग्री व निकडीत साहित्य ठेवण्यासाठी या जागेमध्ये परवानगी दिली आहे. त्यामुळे सदर जागेवर सारखी ये-जा सुरु असते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कश्यपी (ता.जि.नाशिक) धरणग्रस्तांना कराराप्रमाणे नाशिक महापालिका सेवेत सामावून घेणेबाबत

(२२) ४०९४९ (१४-०३-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कश्यपी (ता.जि.नाशिक) धरणग्रस्तांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी दि १८ जानेवारी २०१६ पासून नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धरणग्रस्तांना कराराप्रमाणे नाशिक महापालिका सेवेत सामावून घेण्याची मागणी रास्त असून त्या अनुषंगाने तात्काळ आवश्यक कार्यवाही करण्याचे नाशिक जिल्हाधिकारी यांनी महापालिका आयुक्तांना दि ३ डिसेंबर २०१५ रोजी सूचना केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१६) :(१) होय.
(२) जिल्हाधिकारी, नाशिक यांनी त्यांच्या दि.३.१२.२०१५ च्या पत्रान्वये, धरणग्रस्तांच्या नाशिक महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याच्या मागणीच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.
(३) यासंदर्भात आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी शासनास प्रस्ताव सादर केला होता.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२७.१०.२००९ च्या शासन निर्णयानुसार, प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्या या जाहिरात देऊन व त्यांची सेवा प्रवेश अर्हता व गुणवत्ता विचारात घेऊन करणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत नाशिक महानगरपालिकेस सुचित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे इन्द्रपै (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे कांदळवनाची तोड करुन अनधिकृत पुलाचे बांधकाम केल्याबाबत

(२३) ४०९६२ (०४-०३-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे इन्द्रपै (ता.अलिबाग जि.रायगड) येथील गट नं.९७ मधील राकेश कुमार वधावन यांनी बंगल्याच्या बांधकामासाठी शासनाची परवानगी न घेता सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करून अनधिकृत कांदळवनाची तोड करून पुलाचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुलाच्या बांधकामामुळे समुद्राच्या भरतीचे व पुराचे पाणी व मातीच्या भरावामुळे सासवणे गावातील शेतीचे व घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याबाबत तेथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी रायगड व संबंधित अधिकारी यांचेकडे तक्रार केली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या तक्रारीवर तहसीलदार, अलिबाग यांनी दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास श्री.राकेश कुमार वधावन यांना लेखी नोटीस देवूनही अनधिकृत पुलाचे बांधकाम तोडण्यात आले नाही,हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्या अनुषंगाने अनधिकृत पुलाचे बांधकाम करणाऱ्या श्री.राकेश कुमार वधावन यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०१६) :(१) होय.
(२) होय.
(३) होय. श्री.राकेश कुमार वधावन यांनी स्वत: पुलाचे बांधकाम तोडले नाही. सदर पुलाचे बांधकाम मजबूत असल्याने ते शासनामार्फत जेसीबीच्या सहाय्याने दूर करता आले नाही. तसेच आजूबाजूस घरे असल्याने ते सुरुंग लावून तोडता आले नाही. तथापि नैसर्गिक पाणी वाहून जाण्याचा मार्ग अस्तित्वात ठेवून पुलाचे बाजूस असलेला भराव दूर करण्यात आला आहे.
(४) होय.
(५) तक्रारीच्या अनुषंगाने गट नं. ९७ चे मालक श्री. राकेश कुमार वधावन व पुलाचे काम करणारे ठेकेदार श्री.विजय म्हात्रे यांचेविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ ते ५५ अन्वये मांडवा सागरी पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाची करापोटी दिलेल्या धनादेशामध्ये झालेल्या फसवणुकीबाबत

(२४) ४१००१ (२३-०३-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महानगरपालिकेकडून विविध करापोटी नागरीकांकडून वसूल केल्या जाणाऱ्या करापैकी सन २००६ ते २०१३ पर्यंतच्या सात वर्षाच्या कालावधी मध्ये तब्बल रु. ५० लाख न वटलेले धनादेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, न वटलेले धनादेश ज्या करदात्यांनी दिले आहेत त्यांना मात्र कर भरलेल्या पक्क्या पावत्या देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सात वर्षाचा कालावधी होऊनही दोषी असलेल्या करदात्यावर कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर कर वसुलीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०४-२०१६) :(१) व (२) महानगरपालिकेकडून विविध करापोटी नागरीकांकडून वसूल केल्या जाणाऱ्या करापैकी सन २००६ ते २०१३ पर्यंतच्या कालावधीमध्ये रु.४८,३९,६४८/- न वटलेले धनादेश आहेत हे खरे आहे. तथापि, नागरीकांना धनादेशाद्वारे रक्कम जमा केल्यानंतर त्यांना देण्यात येणाऱ्या पावतीवर धनादेश वटल्यानंतर पावती ग्राहय धरण्यात येईल असे नमूद करुन पावत्या देण्यात आल्या आहेत.

(३) न वटलेल्या धनादेशाची रक्कम रु. ४८,३९,६४८/- इतकी असून त्यापैकी रु.४५,२३,८६५/- इतकी रक्कम संबंधित करदात्याकडून व्याजासह वसूल करण्यात आली आहे.

उर्वरित रक्कम रु. ३,१५,८८३/- इतक्या रकमेची वसूली संबंधित करदात्यांकडून दंड व व्याजासह वसूल करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंब्रा (जि.ठाणे) प्रभाग समिती अंतर्गत भारत गियर्स कंपनी ते नवी मुंबई ऐरोली पर्यंत एमएमआरडीएच्या माध्यमातून भुयारी मार्ग तयार करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत

(२५) ४११५९ (०५-०३-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत भारत गियर्स कंपनी ते नवी मुंबई ऐरोलीपर्यंत एमएमआरडीएच्या माध्यमातून जवळपास ३.५ कि.मी.चा भुयारी मार्ग तयार करण्यासाठी स्थानिक लोकप्रतीनिधिंद्वारे दिनांक ०७ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएमआरडीएने सदरचा भुयारी मार्ग ऐरोली कटई नाका प्रकल्पांतर्गत असल्याचे नमूद करून जमीन अधिग्रहण व वन विभागाची ना हरकत या संबंधी कार्यवाही सुरु असल्याचे दिनांक ०९ डिसेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये स्पष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भुयारी मार्ग होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :(१) व (२) होय.

(३) व (४) सदर प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीचे अधिग्रहण, रेल्वे व वन विभागाचे ना हरकत इत्यादि बाबींवर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

मीरा भाईदर महानगरपालिकेतील (जि.ठाणे) अग्निशमन दलातील काही कर्मचार्यांना बेकायदेशीरपने पदोन्नती देण्यात आल्याबाबत

(२६) ४१७४९ (१४-०३-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा भाईंदर महानगरपालिकेतील (जि.ठाणे) अग्निशमन दलातील काही कर्मचाऱ्यांना बेकायदेशीरपणे आर्थिक देवाण-घेवाण करून पदोन्नती देण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीरपणे पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांना पदावनत करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आर्थिक देवाण घेवाण करून पदोन्नती देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या काही कर्मचा-यांनी पालिकेच्या अग्निशमन विभागामध्ये पदोन्नती मिळण्यासंदर्भात मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे तक्रार याचिका दाखल केली आहे. सदर तक्रार याचिकेच्या अनुषंगाने मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी दि.१९/०६/२०१२ रोजी पारित केलेल्या आदेशास अनुसरुन लिडींग फायरमन या पदावर नियमित कर्मचारी नियुक्त होईपर्यंत व या प्रकरणी औद्योगिक न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पालिकेच्या दोन कर्मचा-यांना लिडींग फायरमन या पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली असल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई व मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी देखील मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे यांच्या आदेशाचे समर्थन करुन महानगरपालिकेने केलेली अपिल याचिका फेटाळली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील क्षयरोग रुग्णांसाठी आवश्यक जेनेक्स मशीन्सबाबत

(२७) ४१९९३ (०५-०३-२०१६). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील क्षयरोगाने ग्रस्त रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून क्षयरोग रुग्णांसाठी आवश्यक जेनेक्स मशीन्स केवळ ७ असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्षय रोगाने ग्रस्त रुग्णांसाठी जेनेक्स मशीन्सची आवश्यकता असून अजून किमान ५ मशीन्सची उपलब्धता करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :(१) मुंबई शहरातील क्षयरोग रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होते हे खरे नाही.

क्षयरोगाने ग्रस्त रुग्णांसाठी मुंबईत सद्य:स्थितत १६ जीन एक्सपर्ट मशीन्स कार्यरत आहेत.

(२) व (३) मुंबई शहरातील क्षयरोग ग्रस्त रुग्णांसाठी कार्यरत असलेलया १६ जीन एक्सपर्ट मशीन्स शिवाय आणखी आवश्यक असलेल्या ४ मशीन्सची मागणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत केंद्र शासनाकडे करण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड आणि पुणे मनपाला बांधकाम कामगारांच्या नोंदणीसाठी धडक मोहिम राबविण्याबाबतच्या शासनाच्या आदेशाबाबत

(२८) ४२५८३ (१६-०३-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने पिंपरी चिंचवड आणि पुणे मनपाला बांधकाम कामगारांच्या नोंदणीसाठी धडक मोहिम राबविण्याचे आदेश दिले होते मात्र संबंधित मनपाने या आदेशाकडे दुर्लक्ष केले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारणास्तव बांधकाम कामगारांना त्यांच्या न्याय हक्कापासून वंचित रहावे लागत आहे हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

शासन आदेशात निर्देशित केल्यानुसार पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने बांधकाम कामगार नोंदणीची धडक मोहिम हाती घेतली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे येथील नौपाडा, वागळे इस्टेट आणि कळवा परिसरात अनेक जुन्या इमारती असून एमआरटीपीचे निकष पाळल्यास त्यांचा पुनर्विकास होणे अशक्य असल्याबाबत

(२९) ४२९०९ (१६-०३-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील नौपाडा, वागळे इस्टेट आणि कळवा अशा दाटीवाटीच्या परिसरात अनेक जुन्या इमारती असून एमआरटीपीचे निकष पाळल्यास त्यांचा पुनर्विकास होणे अशक्य असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्येवा त्या सुमारास निदर्शनास आले अाहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात अनेक जुन्या इमारती असुन त्यांचा पुनर्विकास एमआरटीपीच्या निकषांमुळे रखडला असून याबाबत संबंधित मनपा काही ठाम निर्णय घेत नसल्याने अशा अनेक जुन्या इमारतींचा पुनर्विकास रखडला असल्याने या इमरतींमध्ये वास्तव्य करणाऱ्या नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे

(३) असल्यास, शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०३-२०१६) :(१) नाही. तथापि, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात जुन्या इमारतींचा विकास करणे अवघड असल्याची बाब महानगरपालिका तसेच शासनाचे ब-याच काळापासून निदर्शनास आहे.

(२) व (३) जुन्या व मोडकळीस आलेल्या अधिकृत इमारतींच्या पुनर्विकास ठाणे महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावली मधील "अपेडींक्स- आर" मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय आहे. तथापि, मोडकळीस आलेल्या तसेच अनधिकृत इमारतींचा पुनर्विकास होण्याचे दृष्टीने क्लस्टर योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्याची अधिसुचना मा.उच्च न्यायालयाचे सहमतीनंतर लागू करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

टीडीआरमधील ज्यादा एफएसआय विकत घेऊन विकासक प्रकल्प पूर्ण करुन त्यातील ३० हजार चौ.मीटरची टीडीआरची विक्री करण्यासाठी काढलेल्या निविदा

(३०) ४२९४७ (१६-०३-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील (पश्चिम) गोरेगांव व जोगेश्वरीमध्ये सन २००३ ते २००६ या कालावधीमध्ये एमएमआरडीएकडून पायाभूत सुविधांचे प्रकल्प राबवून या प्रकल्पामधील झोपडपट्ट्यांच्या प्रकल्पातून एमएमआरडीएला १ लाख चौ. मीटरहून अधिक टीडीआर (विकास हस्तांतरण हक्क) मिळाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टीडीआरमधील ज्यादा एफएसआय विकत घेऊन विकासक प्रकल्प पूर्ण करुन त्यातील ३० हजार चौ.मीटरची टीडीआरची विक्री करण्यासाठी गेल्यावर्षी एमएमआरडीएने निविदाही काढल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निविदा जून, २०१५ मध्ये उघडण्यात आल्यावर प्रती. चौ. मीटरला सर्वाधिक ५१ हजार रुपयांची बोली लागल्याने एमएमआरडीएला दीडशे कोटीचा नफा झाला, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, टीडीआर विकत घेण्यासाठी प्रती चौ.मीटरला तब्बल ५१ हजार रुपयांच्या बोलीमध्ये जिंकलेल्या १२ कंपन्यांनी एमएमआरडीकडून एक रुपयाचाही टीडीआर विकत घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, त्यामुळे एमएमआरडीएला फेर निविदा काढण्याचा निर्णय घ्यावा लागला, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०३-२०१६) :(१) होय.
(२) होय.
(३) निविदेमध्ये रु.५१,०००/- प्रति चौ.मी. च्या आसपास बोली प्राप्त झालेली होती.
(४) होय.
(५) होय.
(६) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक ४.१.२०१६ ते १०.२.२०१६ या कालावधीत फेरनिविदा मागविल्या होत्या. त्यामध्ये राखीव किंमत अथवा त्यापेक्षा जास्त दर देणा-या ५ पात्र निविदाकारांना देकार पत्र देण्यात आलेली असून त्यापैकी ३ निविदाकारांनी प्राधिकरणास पूर्ण रक्कम अदा केलेली आहे तर उर्वरित २ निविदाकारांनी अटीनुसार ५०% व त्यापेक्षा जास्त रक्कम प्राधिकरणास अदा केलेली आहे. हस्तांतरणीय विकास हक्काच्या विक्रीबाबत कार्यवाही होत आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

१४ व्या वित्त आयोगाचा निधी राज्याला प्राप्त होऊन देखील त्याचे मुदतीमध्ये नगरविकास विभागाकडून वितरण केले गेले नसल्याबाबत

(३१) ४३६६६ (०६-०३-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लहान मोठ्या शहरातील नागरी सुविधा पुरविण्यासाठी केंद्रीय आयोगाच्या शिफारशीनुसार प्रत्येक वर्षी केंद्राकडून राज्याला निधी प्राप्त होत असतो हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १४ व्या वित्त आयोगाचा निधी राज्याला प्राप्त होऊन देखील त्याचे मुदतीमध्ये नगरविकास विभागाकडून वितरण केले गेले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या निधी वाटपाच्या दिरंगाईमुळे ५ कोटी ८२ लाख ९६ हजार रुपये एवढी रक्कम महापालिका आणि नगरपालिका यांना द्यावी लागली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१६) :(१) केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाकडून राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी अनुदानाचे वितरण केले जाते.
(२) १४ व्या वित्त आयोगाचा निधी विहित मुदतीत नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे वितरणासाठी सुपूर्द करण्यात आला होता.
(३) * चलित पध्दतीनुसार केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान नगरपरिषद संचालनालयामार्फत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा केले जाते.

* राज्यातील ३४० नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून वित्त आयोगाचे अनुदान जमा करण्यासाठी, स्वतंत्र बँक खाती उघडून त्याचा तपशील प्राप्त करुन घेण्यामध्ये काही काळ गेला.

* सदर तपशील प्राप्त झाल्यानंतर नगरपरिषद संचालनालयाने वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त अनुदानाची रक्कम संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बँक खात्यात जमा केली.

* सदर कार्यवाही पूर्ण करण्यासाठी जो अधिकचा कालावधी लागला त्यासाठी रु.५,८२,९६,०६२/- इतकी व्याजाची रक्कम संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सैनिकांच्या कुटूंबियांना शासकिय कार्यालात सन्मानपूर्वक वागणूक मिळत नसल्याबाबत

(३२) ४४५३६ (१६-०३-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशाची सेवा करणाऱ्या जवानांच्या कुटूंबियांना शासकीय कार्यालयात सन्मानपूर्वक वागणूक न देता कागदपत्रीय कामकाजात विलंबासह अडवणूक केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देशाच्या सिमेवर कुटूंब प्रमुख सैनिक म्हणून काम करीत असतांना विज, रेशनकार्ड व मुलभुत सूविधांसाठी त्यांचे कुटूंबियांना शासकीय कार्यालयात मनस्ताप सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, माहे जानेवारी, २०१६ मुरबाड तालुक्यातील असूरी गावातील सैनिक असलेल्या कापटे कुटूबीयांनी घराला विज कनेक्शनसाठीची वांरवार मागणी करुनही अनेक महिने त्याकडे दुर्लक्षीत केल्यांने त्याना आंदोलन करण्यास पवित्रा घ्यावा लागला, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिका-यांवर काय कारवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०३-२०१६) :(१) व (२) हे खरे नाही.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.संकीर्ण-१०९९/३१३६/प्र.क्र.२७२/९९/२८, दिनांक २६/११/१९९९ प्रमाणे माजी सैनिकांना सौजन्याची वागणूक देण्याबाबत तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.कैसेवे-१०९९/२९८१/प्र.क्र.२६५/९९/२८,दिनांक १५/१/२००० प्रमाणे माजी सैनिकांप्रमाणेच राज्यातील आजी सैनिकांना देखील सौजन्याची वागणूक देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच याबाबत कोणतीही तक्रार नाही.

(३) श्री.नामदेव कापटे हे सैन्यदलात कार्यरत नसून ते केंद्रिय गृह खात्याच्या अंतर्गत असलेल्या बॉर्डर सिक्युरिटी फोर्स मध्ये कार्यरत आहेत. त्यांच्या पत्नी श्रीमती नलिनी कापटे यांनी वीज जोडणीसाठी दिनांक २९/४/२०१५ रोजी अर्ज केला होता. त्यांना वीज जोडणी देण्यासाठी ९ खांबांची उभारणी करुन त्यावर ०.४५ कि.मी. इतकी वीज वाहिनी ओढून त्यांना दिनांक १३ डिसेंबर, २०१५ रोजी वीज जोडणी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिकेच्या सुरक्षारक्षक व्यवस्थेतील अनियमितता व कोटयवधी रुपयांस झालेला गैरव्यवहाराबाबत

(३३) ४४८२३ (१६-०३-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या सुरक्षारक्षक व्यवस्थेतील अनियमितता व सरकारी लेखा परीक्षण समितीने सन २०१२-१३ च्या लेखा परीक्षण अहवालात साडेसात कोटी रुपयांच्या देयकावर घेतलेल्या आक्षेपा संदर्भात तसेच या सुरक्षारक्षक व्यवस्थेतील झालेल्या कोटयवधी रुपयांच्या गैरव्यवहाराबाबत नगरसेवक डॉ.सिध्दार्थ धेंडे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे लेखी तक्रार केल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.सिध्दार्थ धेंडे यांनी तक्रारीत नमूद केलेल्या प्रमुख बाबी कोणत्या तसेच संजय बालगुडे यांच्या सुचनेनुसार आयुक्तांनी अतिरिक्त आयुक्त श्री.राजेंद्र जगताप यांच्या नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल पुणे महानगर पालिका आयुक्तांना प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, या अहवालामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तीविरुध्द शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०३-२०१६) :(१) सुरक्षारक्षक व्यवस्थेत झालेल्या कथित गैरव्यवहाराबाबत नगरसेवक डॉ.सिध्दार्थ धेंडे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे लेखी तक्रार केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) डॉ. सिध्दार्थ धेंडे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे लेखी तक्रार केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

श्री.संजय बालगुडे यांनी दिनांक १.६.२०१५ अन्वये सुरक्षा विभागासह पुणे महानगरपलिकेतील सर्व विभागांच्या कंत्राटी कामगारांबाबत उपस्थित केलेल्या विविध मुद्यांबाबत अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल पुणे महानगरपालिका आयुक्तांना प्राप्त झाला आहे.

(३) सदर अहवालामध्ये कंत्राटी कामगार नेमण्याबाबतचे कामकाज उत्तम रितीने कसे करता येईल याबाबत शिफारसी करण्यात आल्या असून, त्यानुसार पुणे महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण डोंबिवली शहरात ३२ रस्त्यांची कामे सुरु असून ते निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(३४) ४५६५६ (०८-०३-२०१६). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली शहरात ३२ रस्त्यांची कामे सुरु असून यातील काही रस्त्यांसाठी प्रक्रिया बदलण्यात आल्यामुळे रस्त्याच्या दर्जाबाबत संशय उपस्थित केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात ३७३ कोटी रुपये खर्च झाले असून रस्ते कॉक्रीटीकरणाची प्रणाली ठरवूनन दिल्याप्रमाणे रस्त्याची कामे सुरु नसल्यामुळे बहुतांश रस्त्याला तडे गेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले, तदनुसार निकृष्ठ दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :(१) हे खरे नाही,

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत २४ रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाची कामे सुरु आहेत. या रस्त्यांच्या कामाच्या मुळ निर्धारीत प्रक्रियेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

(२) रस्ते काँक्रीटीकरणाच्या प्रकल्पातील सर्व कामे निर्धारीत प्रक्रियेनुसार करण्यात येत असून रस्त्यावरील पेव्हमेंट पॅनेल्समधील तडे गेलेल्या पॅनेल्सचे प्रमाण सर्वसाधारणपणे २ ते ३ टक्के इतके आहे.

पेव्हमेंट पॅनेल्समधील तडे गेलेल्या पॅनेल्सच्या अनुषंगाने ठेकेदारास अदा करावयाची आवश्यक रक्कम निविदेतील अटी व शर्तीनुसार रोखून धरण्यात आली आहे. तसेच अशा सर्व

पॅनेल्सबाबत व्ही.जे.टी.आय., मुंबई यांच्याकडून सुचविल्या जाणा-या उपाययोजनांनुसार कार्यवाही करण्याचे प्रस्तावित असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक शौचालये बांधण्यासाठी निविदा मागविल्याबाबत

(३५) ४६१८१ (२३-०३-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने मुंबईत ७ हजार ५६० सार्वजनिक शौचालये बांधण्यासाठी निविदा मागविल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात वेगवेगळया विभागासाठी कंत्राटदार नेमण्यासाठी निविदा मागविल्या होत्या, मात्र एकाच कंत्राटदारांनी दोन विभागासाठी वेगवेगळया दराने निविदा भरल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०४-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने गलिच्छ वस्त्यांमध्ये / झोपडपट्ट्यांमध्ये सार्वजनिक शौचालये बांधण्यासाठी २४ विभागासाठी एकूण २१ निविदा मागविल्या होत्या.

वेगवेगळ्या विभागाची भौगोलिक परिस्थिती वेगळी असल्याने, कामाचा तपशील व भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेऊन एकाच कंत्राटदाराने दोन विभागांसाठी वेगवेगळ्या दराने निविदा भरल्या आहेत.

त्यामुळे या प्रकरणी कारवाई करण्यात आलेली नाही.

उल्हासनगरमध्ये महानगरपालिकेच्या शाळेच्या पुर्नबांधणी रखडली असल्याबाबत

(३६) ४६४५३ (०८-०३-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेने शाळा इमारती पुर्नबांधनीसाठी तीन कोटीची तरतूद केली असून मागील दोन वर्षापासून निविदा काढूनही ठेकेदार मिळत नसल्याने शाळांची पुर्नबांधणी रखडल्याचे माहे. दिनांक १९ डिसेंबर,२०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेची पुर्नबांधणी न झाल्यास उपोषणाचा इशारा लोकप्रतिनिधींनी दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नोव्हेंबर महिन्यात शाळेचा स्लब कोसळून एक विद्यार्थी जखमी झाला होता, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, धोकादायक शाळांची पुर्नबांधणी करण्यात येईल असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आले होते, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :(१) उल्हासनगर महानगरपालिकेने शाळांच्या पुनर्बांधणीकरिता रु.तीन कोटीची तरतूद करुन मागील दोन वर्षापासून निविदा काढूनही एकही निविदा प्राप्त झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे.
(२) हे खरे आहे.
(३) माहे नोव्हेंबर मध्ये महापालिका शाळा क्र. २३ व २६ च्या सिलींगच्या प्लास्टरचा एक तुकडा पडला होता हे खरे आहे. तथापि, त्यामुळे कोणताही विद्यार्थी जखमी झाला नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५) धोकादायक शाळांची पुनर्बांधणी करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत दि.०५.०१.२०१६ ते २५.०१.२०१६ या कालावधीत निविदा मागविण्यात आल्या होत्या.

तथापि, सदर कालावधीत एकही निविदा प्राप्त न झाल्याने यासाठी फेरनिविदा मागविण्याची कार्यवाही महापालिकेमार्फत सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील क्रॉफर्ड मार्केटच्या मंडईचा पुनर्विकास करताना पालिकेने दुकानाचे केलेले निकृष्ट दर्जाचे बांधकामाबाबत

(३७) ४७१३९ (१६-०३-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील क्रॉफर्ड मार्केटच्या मंडईचा पुनर्विकास करताना पालिकेने दुकानाचे केलेले निकृष्ट दर्जाचे बांधकाम आणि प्रवेशद्वाराच्या मोकळ्या जागेत दुकाने बांधण्याच्या घेतलेल्या निर्णयाला विरोध करण्यासाठी दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ पासून क्रॉफर्ड मार्केट बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय महात्मा फुले मार्केट दुकानदार सेवा संस्थेने घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व उक्त मंडईच्या पुनर्विकासात झालेल्या कामाच्या घोटाळ्यातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१६) :(१) मुंबई क्रॉफर्ड मार्केटच्या मंडईचा पुनर्विकास करताना महापालिकेने दुकानाच्या बांधकामाच्या दर्जाबाबत आणि प्रवेशद्वाराच्या मोकळ्या जागेत दुकाने बांधण्याच्या घेतलेल्या निर्णयाला विरोध करण्यासाठी दि.२ फेब्रुवारी, २०१६ पासून क्रॉफर्ड मार्केट बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय महात्मा फुले मार्केट दुकानदार सेवा संस्थेने घेतला हे खरे आहे.

तथापि, दुकानाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले हे खरे नाही.

(२) व (३) याबाबत दुकानदारांचे प्रतिनिधी तसेच सल्लागार यांच्यासमवेत दिनांक ०१ मार्च, २०१६ रोजी संयुक्त बैठक बृहन्मुंबई महानगरपालिकेत घेण्यात आली. सदर बैठकीत दुकानदारांचे प्रश्न सोडविण्यात आले असून दुकानदारांची बैठकीतील निर्णयाच्या अधिन राहून मंडईतील स्थित दुकाने तोडून नवीन दुकाने बांधण्यंस संमती दर्शविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरात कांजण्या आजाराचे रुग्ण आढळून आल्याबाबत

(३८) ४८०५५ (०४-०३-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात कांजण्या आजाराचे ७८ रुग्ण माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्य शासनाने कोणती तातडीची प्रतिबंधक उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :(१) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संसर्गजन्य रोगांसाठी असलेल्या कस्तुरबा रुग्णालयामध्ये माहे जानेवारी, २०१६ मध्ये कांजण्या आजाराचे एकूण ३३४ रुग्ण दाखल झाले होते.

(२) कांजण्या आजारावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालील प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात:-

- कांजण्या हा विषाणुमुळे होणारा संसर्गजन्य रोग असल्यामुळे रुग्णांना कस्तुरबा रुग्णालयात दाखल करुन स्वतंत्र कक्षात (Isolation ward) ठेवण्यात येते.
- एखाद्या ठिकाणी कांजण्यांचा केंद्रीत उद्रेक (Focal Outbreak) आढळल्यास आरोग्य केंद्राद्वारे जनजागृती, विलगीकरण इ. करण्यात येते.
- सदर रुग्णांवर यथोचित (Symptomatic Treatment) उपचार करण्यात येतात.
- अति गंभीर रुग्णांना इंजेक्शन ॲसिक्लोव्हीर आणि ॲण्टीबायोटिक्स (Injection Acyclovir & Antibiotics) देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या अस्तिवात नसलेल्या तुकड्यांसाठी कोट्यावधी रुपयांची यंत्रसामुग्री खरेदी केल्याप्रकरणाच्या चौकशीबाबत

(३९) ४८२०१ (१४-०३-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या अस्तिवात नसलेल्या तुकड्यांसाठी कोट्यावधी रुपयांची यंत्रसामुग्री खरेदी केल्यामुळे यातील ३४ टक्के यंत्रसामुग्री विनावापर पडून असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या संचालकांच्या कालावधीमध्ये ही अनियमितता झाली त्यांच्याकडून लेखा व सेवाविषयक कार्यभार काढून घेतलेला असूनही त्यांच्याकडेच पुन्हा दि १४ ऑगस्ट, २०१५ रोजी हा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहारांची चौकशी करण्यासाठी शासनाने दि ४ डिसेंबर, २०१४ रोजी चौकशी समितीची नेमणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त चौकशी समितीचा शासनास अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(५) असल्यास, शासनाने सदर चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महापालिकेच्या कमला नेहरु रुग्णालयातील अतिदक्षता विभाग गेल्या तीन वर्षांपासून बंद असल्याबाबत

(४०) ४८५२२ (१४-०३-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेच्या कमला नेहरु रुग्णालयातील अतिदक्षता विभाग गेल्या तीन वर्षांपासून बंद असल्याची बाब माहे डिसेंबर २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागात दहा बेड असून, सर्व तांत्रिक साधणे उपलब्ध असतानाही सदर रुग्णालयातील अतिदक्षता विभाग बंद राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कमला नेहरु रुग्णालयातील अतिदक्षता विभाग सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०३-२०१६) :(१) हे खरे आहे.
(२) सदर रुग्णालयातील अतिदक्षता विभाग चालू करण्याकरिता आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ जसे फिजीशयन, आय.सी.यु. फिजीशीयन, इंटेसिव्हीस्ट, कार्डीओलॉजीस्ट, अतिदक्षता विभाग प्रशिक्षित नर्सींगस्टाफ व २४ तास प्रयोगशाळेची उपलब्धता नसल्याने अतिदक्षता विभाग बंद आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(३) पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सध्या केवळ एकच फिजीशीयन उपलब्ध असून, अतिदक्षता विभागासाठी आवश्यक असलेली फिजीशीयन-१०, आय.सी.यु.-७, कार्डीओलॉजीस्ट-१ इत्यादी रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया महानगरपालिकेतर्फे सुरु आहे.
(४) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचनालय यांचेकडून माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये बंधपत्रीत वैद्यकीय अधिकाऱ्यांची मागणी करण्यात आली असता कुणीही महानगरपालिकेत रुजू झाले नाही. तसेच स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देऊनही केवळ एकच फिजीशीयन उपलब्ध झाला.

केंद्राच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेला २ कोटी ६७ लाख रुपयांचा निधी दिला असल्याबाबत

(४१) ४९००१ (१४-०३-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्राच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर शासनाने राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान सुरु केले असून,त्याअंतर्गत पाणंदमुक्त शहरी भाग करण्यात यावा यासाठी शासनाने औरंगाबाद महानगरपालिकेला २ कोटी ६७ लाख रु. निधी दिला आहे, हे खरे आहे,
(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत शौचालय नसणाऱ्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबांकडून अर्ज मागवून ही सुविधा त्यांना मिळावी यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेला सर्वेक्षण करण्याचे आदेश शासनाने दिल्या नंतरही सन २०११ च्या जन गणने नुसार शौचालये नसल्याने उघड्यावर जाणाऱ्या कुटुंबाची संख्या ११९९७ एवढी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या या योजनेंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेला आतापर्यंत किती निधी प्राप्त झाला आहे, व उक्त निधी खर्च करुन ११५० लाभार्थ्यांना किती कालावधीत शौचालये उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१६) : (१) होय हे खरे आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी सुरू आहे. या अभियानांतर्गत जी कुटुंबे शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने उघड्यावर शौचास जातात, अशा कुटुंबांना वैयक्तिक अथवा सामुदायिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देऊन शहरे हागणदारी मुक्त करावयाची आहेत. त्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेस पहिला हप्ता म्हणून रुपये २ कोटी ६७ लक्ष ६२ हजार एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(२) सन २०११ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रात उघड्यावर शौचास जाणाऱ्या कुटुंबांची संख्या ११,९९७ एवढी असून स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत या सर्व कुटुंबांना वैयक्तिक अथवा सामुदायिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

(३) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेस वैयक्तिक अथवा सामुदायिक शौचालय बांधकामाकरिता दोन हप्त्यांमध्ये रुपये ३ कोटी २६ लक्ष २३ हजार एवढा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. या निधीमधून पहिल्या टप्प्यात ३,१८१ कुटुंबांना वैयक्तिक अथवा सामुदायिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डीआरडीए च्या कर्ज प्रकरण मंजुरीबाबत राष्ट्रीयकृत बँकाची उदासीनता असल्याने सदर कर्ज प्रकरण मंजुरी सक्तीची करणे बाबत.

(४२) ५११९१ (०३-०३-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दारिद्र्यरेषेखालील नागरिकाची आर्थिक परिस्थिती सुधारावी व त्यांना जगण्यासाठी रोजगार मिळावा या साठी केंद्रशासनाने या नागरिकासाठी राष्ट्रीय नागरी उपजीविका कर्जयोजना अंतर्गत लातूर जिल्ह्यातील अनेक प्रस्ताव नगर पालिका व महानगर पालिका यांनी बँकेकडे सादर करूनही सदर कर्ज प्रकरण मंजुरीसाठी या बँका उदासीन असल्याचे व सदर बँकेस दिलेले उदिष्ट पूर्ण करीत नसल्याने सदर योजनेचा उद्देश सफल झाला नसल्याचे दिनांक ५ जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(३) सदर लाभार्थ्यांची कर्ज प्रकरणे मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :(१) व (२) लातूर जिल्ह्यातील महानगर पालिका व नगर पालिका यांनी राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान (NULM) स्वयंरोजगार कार्यक्रम घटकांतर्गत वैयक्तीक कर्ज प्रकरणे (SEP-I) या उप घटकांतर्गत ३७१ उद्दिष्टांपैकी ३१२ कर्ज प्रकरणे बँकेने मंजूर केलेली आहेत. तसेच स्वयंसहाय्यता गट (SEP-SHG Bank Linkage) या अंतर्गत एकूण ७५ उद्दिष्टांपैकी ५५ बचत गटाचे कर्ज प्रस्ताव बँकेने मंजूर केलेले आहेत.

(३) सदर कर्ज प्रकरण मंजूरीसाठी राज्य अभियान संचालक तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, संबंधित महानगरपालिका व नगरपालिकेमार्फत वारंवार बँकेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महापालिकेच्या वतीने पुरवठा करण्यात येणा-या पाण्यापैकी आठ टक्के पाणी दुषीत असल्याबाबत

(४३) ५२३९० (०५-०३-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या वतीने पुरवठा करण्यात येणा-या पाण्यापैकी आठ टक्के पाणी दुषीत असल्याचे पालिकेच्या अहवालात स्पष्ट झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आठ टक्क्कापैकी दोन टक्के पाण्यात ईकोलाय जीवाणु आढळून आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दररोज वितरीत केल्या जाणाऱ्या पाण्याचे जलाशय व जलवितरण व्यवस्थेत माहे जानेवारी, २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या एकूण पाण्याच्या नमुन्यांपैकी ३.८१ टक्के नमुने पिण्यास अयोग्य आढळले होते.

(२) जानेवारी, २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या एकूण पाण्याच्या नमुन्यांपैकी १.२९ टक्के नमुन्यांमध्ये ई-कोलाय जीवाणू आढळून आले होते.

(३) तुळशी, विहार, तानसा, वैतरणा (मोडकसागर), मध्य वैतरणा हे महानगरपालिकेच्या अखत्यारीतील तलाव तसेच उर्ध्व वैतरणा व भातसा हे शासनाच्या अखत्यारीतील दोन तलाव असे मिळून एकूण सात तलाव हे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये पाणी पुरवठा करण्याकरिता मुख्य पाण्याचे स्त्रोत म्हणून वापरले जातात.

या मुख्य स्त्रोतातून घेण्यात आलेले पाणी हे महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी स्थित शुध्दीकरण केंद्रात शुध्द केले जाते. यासाठी महानगरपालिकेची भांडुप संकुल, पांजरापूर संकुल तसेच तुळशी व विहार येथील शुध्दीकरण केंद्रे २४ तास कार्यरत आहेत.

या केंद्रामध्ये निवळणे (Sedimentation), जलगाळणी (Filteration) व हरिणीकरण (Chlorination) या मान्यताप्राप्त क्रियांद्वारे जलशुध्दीकरण आयएस-१०५०० १९९१ या भारतीय मानकातील निकषाप्रमाणे केले जाते. सदर शुध्दीकरण केंद्रामधील प्रयोगशाळेत दर तासाला पाण्याची चाचणी करुन पाण्याच्या योग्यतेची खात्री केली जाते. तसेच महानगरपालिकेच्या विविध जलाशयांमध्ये पुन्हा हरिणीकरण करुन पाण्याच्या शुध्दतेबाबत योग्य नियंत्रण ठेवले जाते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे दुषित पाण्याची तक्रार आल्यास, संबंधित परिसर विभागीय स्तरावर देखरेखीखाली ठेवण्यात येतो. पाणी पुरवठ्याच्या वेळी सदर परिसर नियंत्रण करुन दुषित पाणी फायर हायड्रंट किंवा फ्लशिंग पॉईटद्वारे संपूर्णपणे बाहेर काढण्यात येते. पाणी गळतीची अचूक जागा शोधून ती दुरुस्ती करण्यात येते.

तसेच, सदर परिसरामध्ये गळती दुरुस्ती केल्यानंतर त्या ठिकाणच्या पाण्याचे नमुने प्रयोगशाळेमध्ये तपासणी करुन पुरवठा करण्यात आलेले पाणी पिण्यायोग्य आहे याची खात्री करुन, नंतरच जलजोडणी ग्राहकांना पाणी पुरवठा करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील धोबीघाट या ठिकाणी सुरु असलेल्या झोपु प्रकल्पामध्ये सध्याची कपडे धुण्याच्या जागेबाबत

(४४) ५२३९३ (१६-०३-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धोबीघाट या ठिकाणी सुरु असलेल्या झोपु प्रकल्पामध्ये सध्याची कपडे धुण्याची जागा विकासाच्या नावाखाली विकासकास दिली जात असून या प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी एका राजकीय पक्षाच्या पदाधिका-याने केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धोबीघाट ही जागा संरक्षित ठेऊन एसआरए योजना राबवावी आणि नव्या विकास आराखड्यात यावर धोबीघाट असेच आरक्षण ठेवण्यात यावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता (२८-०३-२०१६) :(१) सी.एस..क्र. १ व २ सातरस्ता, धोबीघाट, मुंबई या बहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर श्री साईबाबानगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसंदर्भात साधारण अशा आशयाचे माजी नगरसेवक यांचे दि.१५.२.२०१६ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) मुंबईतील धोबीघाटाच्या बाजूला वर नमूद केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये सध्याची अस्तित्वात असलेली कपडे धुण्याची जागा (धोबीघाट) समसविष्ट नाही.

जी/दक्षिण विभागातील भूभाग क्र.४४, २(भाग) लोअर परेल डिव्हिजन येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि.२५.०२.२०१५ रोजी प्रकाशित केलेल्या प्रारुप विकास आराखडा २०३४ मध्ये "धोबीघाट" हे नामनिर्देशन दर्शविण्यात आले होते. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि.२५.०२.२०१५ रोजी शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेमधील चुकांची सखोल शहानिशा करुन सगळ्या चुकांची जागेवरील परिस्थितीनुसार गुणवत्तेनुसार, नियोजनाचे दृष्टीने व कायदेशीर बाबी तपासून त्यानुरुप दुरुस्ती करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील प्रकरण तीन च्या तरतुदींचे पालन करुन प्रारुप विकास योजना कलम २६ अन्वये महासभेच्या पूर्वमान्यतेने सूचना/हरकतींसाठी पुर्नप्रसिध्द करावी असे राज्य शासनाकडून आदेश देण्यात आले आहेत. राज्य शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रारुप विकास योजना पुर्नप्रसिध्दीसाठी मुदतवाढीचे आदेश दि.१४.९.२०१५ रोजी दिले आहेत. सदरहू आदेशानुसार विकास आराखडा पुनर्प्रसिध्द

करण्यासाठी महापालिकेस दि.२३/८/२०१५ ते दि.२२/२/२०१६ पर्यंत ६ महिन्यांची मुदतवाढ दिली होती. हा कालावधी पुन्हा वाढवून तो दि.३१/५/२०१६ पर्यंत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अंधेरी-कुर्ला रोड, सागबाग, मुंबई-५९ येथील न्यु मोनार्क बिल्डर्स यांचे झोपडपट्टी पुनर्वसन (एस.आर.ए.) योजनेबाबत

(४५) ५२३९५ (०५-०३-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी-कुर्ला रोड, सागबाग, मुंबई-५९ येथील सागबाग सर्वे नं.७०६ विभागात न्यु मोनार्क बिल्डर्स यांचे झोपडपट्टी पुनर्वसन (एस.आर.ए.) योजनेचे काम फक्त ४० टक्केच झाले असून सदरील काम हे १८ वर्षे अपूर्णावस्थेत ठेवले असल्याने याबाबतची तक्रार वारंवार संबंधितांकडे केली. तसेच या मोनार्क बिल्डिर्सवर तत्कालीन मुख्यमंत्री यांनी बदलीचे आदेश देऊनही अद्यापपर्यंत संबंधितांकडून कोणतीच दखल घेतली नसल्याने सदरील बिल्डर्सवर कारवाई होणेबाबत मा.मुख्यमंत्री, यांना दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी लेखी निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार न्यु मोनार्क बिल्डर्सवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता (१९-०३-२०१६) :(१) सदरहू विषयांच्या अनुषंगाने प्राप्त झालेले दि.१२/१/२०१६ रोजीचे निवेदन उचित कार्यवाहीसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले आहे.

(२) मौजे मरोळ येथील न.भू.क्र.७०६/२ ते ८, ७०६/११, ७०६/१२, ७०६/१४ ते १६ व ७०६/२२ या भूभागावर सागबाग स्नेहसागर सहकारी गृहनिर्माण संस्थेची झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत आहे. त्यामध्ये ११४४ पात्र झोपडीधारक व ८ धार्मिक स्थळांचा समावेश आहे. सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत ७ पुनर्वसन इमारतीचा समावेश आहे. त्यापैकी ३ इमारतींना पूर्ण भोगवटा प्रमाणापत्र देण्यात आले आहे. त्यामध्ये आतापर्यंत ५६२ झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. सदरहू योजनेचे आतापर्यंत ४८.८० टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित झोपडीधारकांना २६९ चो.फूट क्षेत्रुळाच्या सदनिका देण्याकरिता सुधारित आशयपत्र दि.४/१२/२०१५ रोजी देण्यात आले आहे. योजनेतील पुनर्वसन इमारत क्र.७ च्या पूर्ण बांधकामसा दि.१/३/२०१६ रोजी परवानगी देण्यात आली आहे व त्यानुसार बांधकाम प्रगतीपथावरआहे. पुनर्वसन इमारत क्र.३ चे आराखडे व बांधकाम परवानगीबाबतचा प्रस्ताव सादरकरण्याचे व पुनर्वसन इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम सादर करण्याबाबत प्राधिकरणाकडून विकासकास नोटीस देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील देवनार येथील राजीव गांधी मैदानावर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे केल्याबाबत

(४६) ५२७२२ (१६-०३-२०१६). श्री.मोहन फड (पाथरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील देवनार येथील राजीव गांधी मैदानावर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे उभारण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील रफिनगर महापालिका शाळेसमोर असलेल्या मोठ्या मैदानावर होणा-या अतिक्रमणांना विरोध करणा-या स्थानिक तरुणांना जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याची तक्रार दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ वा त्यासुमारास स्थानिक पोलिसांकडे करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दबावाखाली हे मैदान वाचविण्यासाठी प्रयत्न करणा-या युवकांना दडपण्यात येत असल्याची तक्रार मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १ मार्च, २०१६ व त्यासुमारास करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

देवनार येथे राजीव गांधी मैदान अस्तित्वात नसून रफीनगर महापालिका शाळेसमोर असलेल्या महापालिकेच्या जागेवर स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सुचविल्यानुसार व म्हाडा प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या, वैद्यकीय सुविधा उपलब्ध होण्यासाठीच्या प्रस्तावानुसार म्हाडा प्राधिकरणाकडून सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(२) अशा प्रकारची तक्रार स्थानिक पोलीसांना प्राप्त झालेली नाही.

(३) अशा प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

नालासोपारा (प) (ता.वसई) येथिल सर्वे नं. ४११ या नालासोपारा विकास क्षेत्राखाली आरक्षित असलेल्या भुखंडावरील अनधिकृत इमारतीचे बांधकामाबाबत

(४७) ५२८२० (१६-०३-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील नालासोपारा (प.) (ता.वसई) येथिल सर्वे नं. ४११ हा भुखंड नालासोपारा विकास क्षेत्राखाली आरक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भुखंडावर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत इमारतीचे बांधकाम करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या इमारती तोडण्यासंदर्भात एस.आर.टी.पी कायद्यांतर्गत वसई-विरार महापालिकेने दिनांक २८ डिसेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास सर्व इमारत विकासकांना नोटीस दिली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक २७ फेब्रुवारी २०१६ रोजी महापालिकेने फक्त एक इमारत पाडून बाकी १९ इमारतींवर कोणतीही कारवाई केली नाही,हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या अनधिकृत इमारतींना संरक्षण दिल्याबाबत महापालिका आयुक्त, उपायुक्त सहआयुक्त यांचे विरुध्द शासनाने काय कारवाई केली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे का आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०३-२०१६) :(१) होय, स. नं. ४११ मौजे गास चा काही भाग मंजूर विकास आराखडयानुसार ना विकास क्षेत्रामध्ये समाविष्ट असून उर्वरित भागापैकी काही भाग बस स्थानक व बस डेपोचे आरक्षण व खेळाचे मैदान या आरक्षणाने बाधित आहे. तसेच शैक्षणिक इमारत, स्पोर्टस कॉम्ल्पेक्स, एस.टी.पी., इलेक्ट्रीक सबस्टेशन डी.पी. रस्ता, वॉटर बॉडीज या आरक्षणाखालील क्षेत्र ई.पी.-१०१ अन्वये ना-विकास क्षेत्रात समाविष्ट आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) महानगर पालिकेने फक्त एक इमारत पाडली, हे खरे नाही. दि. २८/१/२०१६ ते दि.१/२/२०१६ पर्यंत महानगरपालिकेने स. नं. ४११ मौजे गास येथील ५ इमारती व ३ प्लिंथ निष्कासित केल्या आहेत. उर्वरित अनधिकृत बांधकामावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना कायद्याअंतर्गत महानगरपालिकेमार्फत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. परंतु संबंधित विकासक यांनी मा. न्यायालयातून मनाई हुकुम/स्थगिती आदेश प्राप्त केले असून महानगर पालिकेतर्फे सदरहू आदेश उठविण्याबाबत कायदेशीर प्रयत्न सुरु आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) लागू नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अपंगाकरीता राखीव असलेल्या मांडवी आठवडे बाजाराची निविदा ई प्रणालीने न मागविता वृत्तपत्र जाहिरातीद्वारे मागविल्याबाबत

(४८) ५२८३८ (१४-०३-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अपंगाकरीता राखीव असलेल्या मांडवी आठवडे बाजाराची सन २०१५-१६ करिताची निविदा ई प्रणालीने मागवावी असे शासनाचे निर्देश होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची निविदा वृत्तपत्र जाहिरातीद्वारे मागविण्यात येवून या निविदेकरिता श्री.शाहीद महेबूब सय्यद राहणार तुळींज नालासोपारा यांच्या ठेक्याची निवड करण्यात आली असून, निविदेचा ठेका द्यायच्या वेळी निविदा ई प्रणालीने काढली न गेल्याचा आक्षेप घेतला जावून स्थायी समितीने सदरच्या निविदेची कार्यवाही स्थगित केली होती, हे खरे आहे काय,

(३) तसेच श्री. शाहीद यांनी अन्य ३ लाखांहून अधिकच्या निविदा ई निविदा नसल्याबाबत आक्षेप घेवूनही तसेच स्थायी समितीचे आक्षेप असूनही फक्त श्री.शाहीद यांची निविदा ई निविदा करण्यात आली बाकीच्या सर्व निविदा वृत्तपत्र जाहिरातीनुसार कार्यान्वित करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अपंगाकरीता राखीव असलेल्या मांडवी आठवडे बाजाराची निविदा ई-प्रणालीने नमागविता वृत्तपत्र जाहिरातीद्वारे मागविल्यामुळे ती रद्द करूनही त्यानंतर सदरच्या निविदेचा ठेका अपंग नसलेल्या श्री.मंदार बंडू पिंपळे यांना बेकायदेशीरपणे दिला असून नैसर्गिक न्याय न करता अपंगांस राखीव रोजगार लाभापासून वंचित ठेवले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०३-२०१६) :(१) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या अपंगाकरीता राखीव असलेल्या मांडवी आठवडे बाजाराची सन २०१५-१६ करिताची निविदा ई टेंडरद्वारे मागविण्यात आली.

(२) उक्त निविदा प्रथम वृत्तपत्र जाहिरातीद्वारे मागविण्यात आली होती. परंतु निविदेद्वारे ठेका प्रदान करताना शासनाचे ई टेंडर धोरण स्थायी समितीच्या निदर्शनास आल्याने स्थायी समितीने उक्त प्रक्रिया रद्द ठरवून निविदा ई टेंडरद्वारे मागविण्याचा निर्णय घेतला.

(३) हे अंशत: खरे आहे.

स्थायी समितीनेही कोणताही आक्षेप घेतल्याचे निदर्शनास येत नाही. तसेच श्री.शाहिद यांनीही सदर निर्णय घेताना कोणताही आक्षेप घेतला नाही. परंतु तद् नंतर त्यांनी काही काळ गेल्यानंतर आक्षेप घेतला आहे. तसेच परंतु सन २०१५-१६ मध्ये अशाच ९ प्रकरणी स्थायी समितीने ई-निविदा प्रक्रिया राबविली नाही ही वस्तुस्थिती आहे.

(४) मांडवी बाजाराची बाजार करवसुली ठेका पध्दतीने देणेकरीता ३ वेळा ई-निविदा प्रक्रिया राबविली. परंतु एकाही अपंग व्यक्तीने निविदा न भरल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान टाळणेकरीता स्थायी समितीने सदरचा ठेका सन २०१४-१५ चे ठेकेदार श्री.मंदार बंडू पिंपळे यांना मुदतवाढीद्वारे १० टक्के अतिरिक्त रकमेने सन २०१५-१६ करीता देण्यात आला.

श्री.पिंपळे हे अपंग नाहीत ही वसतुस्थिती आहे.

(५) या प्रकरणी ई-निविदेद्वारा ठेके का देण्यात आले नाहीत तसेच अपंग नसलेल्या व्यक्तींना सदर ठेका कसा देण्यात आला याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

चिपळूण (जि.रत्नागिरी) शहर विकास आराखड्याला होत असलेल्या विरोधाबाबत

(४९) ५३०४६ (१४-०३-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहर विकास आराखडा चुकीच्या पध्दतीने करण्यात आलेला असल्याबाबत स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींकडून आक्षेप घेण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखड्यासाठी शहरात प्रचंड विरोध असून हजारो हरकती दाखल झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने प्रस्तावित चिपळूण शहर विकास आराखडा रद्द करणे वा सुधारीत आराखडा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०३-२०१६) :(१) चिपळूण शहराची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यावर स्थानिक नागरीक व लोक प्रतिनिधी यांचे मार्फत सुचना/हरकती घेण्यात आल्या आहेत.

(२) विकास आराखडा प्रसिध्द झाल्यानंतर १६५१ सूचना/ हरकतीचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

(३) प्राप्त सुचना /हरकतींवर नियुक्त होणारी नियोजन समिती सुनावणी देणार आहे. सुनावणीवरील नियोजन समितीचा अहवाल विचारात घेऊन विकास योजना शासनास सादर झालेनंतर शासनस्तरावरुन उचित कार्यवाही करणेत येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डोंबिवली पूर्व येथील भोपर गावातील दि प्रायमेटेक्स मशिनरी कंपनीच्या जागेवर डिमार्ट अनधिकृत बांधकाम तातडीने थांबविण्याचे आदेश

(५०) ५३०५९ (१४-०३-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली पूर्व येथील भोपर गावातील दि प्रायमेटेक्स मशिनरी कंपनीच्या जागेवर डिमार्ट अनधिकृत बांधकाम तातडीने थांबविण्याचे आदेश कल्याण-डोंबिवली महापालिकेने माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिले, असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डीमार्ट मॉलच्या बांधकामासाठी कोणतीही शासकीय परवानगी नसल्याने संबंधित डीमार्ट मॉल व संबंधित महापालिकेतील अधिकाऱ्यांशी संगनमत करुन अनधिकृतरित्या बांधकाम करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार डीमार्ट मॉलचे अनधिकृत बांधकाम थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०३-२०१६) :(१) कल्याण-डोबिवली महानगरपालिकेचे प्रश्नाधीन बांधकामबाबत संबंधित नियोजन प्राधिकरण या नात्याने कार्यवाही करणेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण दिनांक २५.०२.२०१६ रोजी कळविले आहे.
(२), (३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर जमिनीवरील डीमार्ट मॉलच्या बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३(१) अन्वये दि.०२.०३.२०१६ रोजी नोटीस बजावली असून सदर बांधकामावर अधिनियमातील तरतूदींनुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.